महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १३ वा दिनांक : २७/०९/२०२४ वार : शुक्रवार

## मोदी हे प्रधानमंत्री नसुन प्रचार मंत्री असल्यासारखे वागतात




**चंदीगड :** कांग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी आज चंदीगडमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींची विचारसरणी बिघडलेली आहे. ते ज्या प्रकारची भाषा वापरत आहेत, ती त्यांच्या पदाच्या प्रतिष्ठेशी मिळतीजुळती नाही.

हरियाणा विधानसभा निवडणुकीसंदर्भात भूपेश बघेल यांनी पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले की, पंतप्रधान निवडणुकीदरम्यान अतिशय बाजारू भाषा वापरतात. कधी ते मुस्लिमांना टार्गेट करतात, तर कधी सफेद खोटे बोलून लोकांना फसवण्याचा प्रयत्न करतात.

ते म्हणाले की, पंतप्रधानांनी राज्यांच्या निवडणुकांमध्ये जास्त प्रचार करणे योग्य नाही, पण मोदी हे पंतप्रधान कमी आणि प्रचार मंत्री जास्त आहेत.

भाजप सरकारला 6 महिन्यांत अधिवेशनही बोलावता आले नाही हरियाणाच्या निवडणुकीबाबत भूपेश बघेल म्हणाले की, आज संपूर्ण देशाच्या नजरा हरियाणाकडे लागल्या आहेत, कारण हरियाणाच्या निवडणुकीने देशाच्या निवडणुकांना नेहमीच नवी दिशा दिली आहे. भाजपच्या सत्ताकाळाबद्दल ते म्हणाले की, साडेनऊ वर्षांनंतर निवडणुकीपूर्वी मनोहर लाल खट्टर यांना खुर्चीवरून हटवल्याने भाजपला येथे आपला पराभव स्पष्ट दिसत आहे.

सध्याचे मुख्यमंत्री सैनी यांच्याबाबत ते म्हणाले की, देशाच्या इतिहासात कदाचित ही पहिलीच वेळ आहे की एखाद्या राज्य सरकारला 6 महिन्यांत अधिवेशनही बोलावता आले नाही. ते म्हणाले की, नायबसिंग सैनी एकदाही विधानसभेला सामोरे जाऊ शकले नाहीत.

कंगनाच्या या वक्तव्यावर कोणीही स्पष्टीकरण देत नाहीये बघेल म्हणाले की, या निवडणुकीत शेतकरी, सैनिक आणि पैलवानांमुळे भाजपला संपूर्ण राज्यातील जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे मोदी सरकारला शेतीविषयक 3 काळे कायदे मागे घ्यावे लागले.

आता कंगना रणौतच्या वक्तव्यानंतर पुन्हा देशावर हे कायदे लादण्याचा धोका निर्माण झाला आहे. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी, अमित शहा किंवा पक्षाध्यक्ष जेपी नड्डा यांनी कंगनाच्या वक्तव्यावर कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही ही खेदाची बाब आहे.

सैनिकांचाही अपमान करण्यात आला भूपेश बघेल म्हणाले की, हरियाणाच्या जवानांनी देशाच्या सीमेवर शत्रूचा शौर्याने मुकाबला केला आणि आपल्या प्राणांची आहुती दिली, मात्र मोदी सरकारने जवानांचा अवमान करण्याचे काम केले आहे. पैलवानांचीही फसवणूक झाली आहे.

ते म्हणाले की, हरियाणातील लोक त्यांच्या महिला कुस्तीपटूंच्या अपमानाचा बदला घेण्यासाठी पूर्णपणे तयार आहेत. यावेळी कॉंग्रेस नेते राणा गुरजीत सिंग, कॉंग्रेस हरियाणाचे मीडिया प्रभारी केवल धिंग्रा यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

## शिवसेना खुर्द आणि शिवसेना बुद्रुक कोण?

### छत्रपती संभाजीराजेंची राजकीय परिस्थितीवर मिश्किल टीका




**मुबंई :** महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल झाले आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विभाजन होऊन दोन्ही पक्षाचे एक एक गट महायुती सरकारमध्ये आहेत तर दोन गट महाविकास आघाडीमध्ये आहेत. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असे चित्र होते, मात्र आता यात तिसरी आघाडी देखील तयार झाली आहे. छत्रपती संभाजीराजे यांचा स्वराज्य पक्ष आणि आमदार बच्चू कडू यांचा प्रहार जनशक्ती पक्ष तिसरी आघाडी बनवण्याच्या तयारीत आहेत. यासंदर्भात मुंबईत बैठकही पार पडली आहे. यानंतर संभाजीराजे छत्रपती यांनी राजकीय परिस्थितीवर भाष्य केले आहे.

छत्रपती संभाजीराजे म्हणाले, दोन कॉंग्रेस, दोन राष्ट्रवादी पक्ष यामुळे मी गोंधळून गेलो आहे. गाव दोन नावांचे असतात, तसे कोण आहेत? राष्ट्रवादी खुर्द, कोण आहेत ? राष्ट्रवादी बुद्रुक कोण आहे? शिवसेना खुर्द आणि शिवसेना बुद्रुक कोण? हे का जनतेच्या हितासाठी झाले का? तुम्ही आमच्या आयुष्याचा खेळ केला, अशी मिश्किल टीका संभाजीराजे यांनी केली आहे.

पुढे बोलताना संभाजीराजे म्हणाले, माझे चॅलेंज आहे यांना, तुम्ही किल्ल्यांसाठी किती पैसे दिले हे सांगा. ७५ वर्षात १ कोटी खर्च. फक्त शिवाजी महाराजांचे नाव घ्यायचे. राजकोट किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा पुतळा बसवला तेव्हा मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले होते. १२ डिसेंबर रोजीच मी सांगितले होते की पुतळ्याचे काम योग्य पद्धतीने झाले नाही. मात्र तेव्हा कोणी बोलले नाही, विरोधकही शांत होते.

संभाजीराजे म्हणाले, शर्यतीतील शेवटचे घोडे पुढे आले तर त्याला डार्क हॉर्स असे नाव दिले जाते. तसे आपण डार्क हॉर्स आहोत. आपण टुकटुकचा घोडा असून कसे मागून पुढे जाणार हे कळणार पण नाही. आम्ही का फक्त आयुष्यभर चळवळ करायची? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. यावेळी बच्चू कडू यांचे कौतुक करताना संभाजीराजे म्हणाले, बच्चू कडू यांच्याकडून शिकण्यासारखे आहे की, वेळप्रसंगी कुठली महायुती? आता थोकठोकी होणार, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे.

बच्चू कडू आणि माझी मुंबईत बैठक झाली. तेव्हा आपण नावीन्यपूर्ण महाराष्ट्र घडवण्याचा प्रयत्न करू, अशी आमची चर्चा झाली. ही चर्चा सुरू असताना शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी एकत्र आलो आहोत, असे या चर्चेत निष्पन्न झाले. वेगळा महाराष्ट्र आपण घडवू शकतो आणि त्यानुसार आम्ही प्रयत्न करणार असल्याचे संभाजीराजे छत्रपती यांनी यावेळी सांगितले.

## मंत्री छगन भुजबळ यांची अचानक प्रकृती बिघडली - मुंबईला हलवले



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तसेच राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची अचानक प्रकृती बिघडली आहे. यामुळे त्यांना तातडीने विशेष विमानाने बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. छगन भुजबळ पुण्यात असताना त्यांची अचानक प्रकृती बिघडली. यावेळी पुण्याहून विशेष विमानाची सोय करत त्यांना थेट बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून उपचार सुरू करण्यात आले आहेत.

छगन भुजबळ यांना नेमका कशाचा त्रास झाला व कशामुळे त्यांची अचानक प्रकृती बिघडली हे अद्याप समजू शकले नाही. मात्र बॉम्बे हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करण्यात आले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सध्या राज्यात विविध ठिकाणी आंदोलने सुरू होते तसेच आगामी विधानसभा निवडणुकीचे देखील वातावरण असल्याने सर्वच पक्ष व प्रमुख नेते मोर्चेबांधणी करत आहेत.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षातील प्रमुख नेत्यांचे राज्यभर दौरे देखील सुरू आहेत. यात राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाची जनसन्मान यात्रा देखील राज्यभर सुरू आहे. यात पक्षाच्या प्रमुख नेत्यांना उपस्थित राहावे लागते. यात सातत्याने होणारा प्रवास व दगदग यामुळे देखील प्रकृती खराब होऊ शकते. छगन भुजबळ यांचे देखील राज्यभर दौरे सुरू होते. अनेक ठिकाणी ओबीसी समाजाचे आंदोलन सुरू होते त्यासाठी देखील त्यांना भेटी द्याव्या लागत होत्या. यामुळे कदाचित त्यांना थकवा आला असू शकतो. मात्र छगन भुजबळ यांना नेमका काय त्रास होतोय याची माहिती समोर येऊ शकली नाही.

दरम्यान, राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांना यापूर्वी नोव्हेंबर 2022 मध्येही अस्वस्थ वाटू लागल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रकृती बिघडल्याने त्यांना मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते. त्यावेळी छगन भुजबळ यांना व्हायरल इन्फेक्शन झाले होते.

## धनगर आरक्षणासाठी आंदोलक आक्रमक, जलसमाधी घेत असल्याचे सांगून दोघे बेपत्ता

**अहमदनगर** - धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी मागील 9 दिवसापासून धनगर समाजाचे 6 आंदोलक उपोषणासाठी बसले होते. त्यामधीलबाळासाहेब कोळसे रा. आडगाव ता. पाथर्डी आणि प्रल्हाद चोरमारे रा. संभाजीनगर यांनी शौचास जावून येतो सांगून उपोषण स्थळावरून निघून गेले व धनगर समाजाच्या एका कार्यकर्त्याला फोन केला. यात आम्ही जलसमाधी घेत आहोत, तुम्हाला शेवटचा जय मल्हार असे सांगून त्यांनी फोन बंद केला आहे. अशी माहिती मिळताच सर्व प्रवरासंगम येथील पुलावर आले असता या ठिकाणी प्रल्हाद चोरमारे यांची कार उभी असून डॅश बोर्डवर चिठ्ठी लिहून ठेवलेली दिसून आले. तसेच त्यांचे मोबाईल कारच्या सीटवर ठेवलेले आहेत.तसेच गाडी लॉक केलेली आहे. त्यामुळे त्यांचा पाण्यामध्ये शोध घेण्यात येत असल्याचे कळवण्यात आले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanashaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ सप्टेंबर २०२४

# गुरु मिश्री होमिओपॅथी व आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय आणि फार्मसी महाविद्यालयाचे सचिव डॉ. योगेशभैय्या शांतीलालजी देसरडा यांचा वाढदिवस उत्साहात साजरा














# महाराष्ट्र जनशक्ती

website: ww.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ सप्टेंबर २०२४

## राष्ट्रीय सेवा योजनेतून श्रम संस्काराचे बीजारोपण : प्रा .डॉ .पांडुरंग नवल










**मंठा (जि. जालना) :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष योगदान आहे. श्रम प्रतिष्ठेला महत्त्व देणारी ही योजना आहे. ज्ञानाला कृतीची जोड दिल्यामुळे विद्यार्थ्यांत एक समतोल व नेमकेपणा येतो. राष्ट्रीय सेवा योजनेतून श्रमसंस्काराचे बीजारोपण करण्याचे काम केले जाते असे प्रतिपादन प्र. डॉ. पांडुरंग नवल यांनी केले.

ते स्वामी विवेकानंद महाविद्यालयत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. 24 सप्टेंबर हा दिवस प्रत्येक वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधव हे होते.

प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी व राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रस्ताविकपर विचार मांडताना राष्ट्रीय सेवा योजनेची कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. वसंत जागृत म्हणाले की महाविद्यालयीन काळात श्रमप्रतिष्ठेचे मूल्य समजावून देण्यासाठी राष्ट्रीय योजना आहे. जो हे मूल्य जाणतो अनुभवतो तोच राष्ट्रीय सेवायोजनेत सहभागी होतो.

यावेळी ग्रीन क्लबचे जिल्हा मास्टर ट्रेनर डॉ. राजेश गायकवाड यांनी पाणी व्यवस्थापन आणि तरुणाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले\. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधव म्हणाले की तारुण्य म्हणजे काहीतरी भव्य दिव्य करण्याचा हा काळ आहे. गगनभरारी मारून अवघे जग पादाक्रांत करण्याचा हा काळ आहे.आपल्या सर्व इच्छा आकांक्षा प्रत्येक्षात उतरवून आपल्या विधायक शक्तीचे आदर्श रूप दाखविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी केले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ . विनायक काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दक्षता देशमुख मॅडम यांनी केले. शेवटी महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला . यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते .

## विद्यापीठाच्या ग्रंथालयात शिरले पाणी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मध्यवर्ती ग्रंथालयाच्या (ज्ञान स्त्रोत केंद्र) तळघरात बुधवारी (२५ सप्टेंबर) सायंकाळी पाणी शिरले. यामुळे लाखो रुपयांची सुमारे २ हजार पुस्तके भिजली. ही पुस्तके तत्काळ दुसरीकडे स्थलांतरित केल्याचे विद्यापीठाने सांगितले.

अग्निशमन दलाला पाणी बाहेर काढण्यासाठी सुमारे दीड तासापेक्षा अधिक वेळ लागला तरीही सर्व पाणी बाहेर काढता आले नाही. २४ वर्षांपूर्वीही असेच तळघरात पाणी शिरले होते.

१९६० दरम्यान बांधकाम झालेल्या ग्रंथालयाच्या तळघरात जुनी, दुर्मिळ पुस्तके आहेत. विद्यापीठात सायंकाळी ५.३० वाजता मुसळधार पाऊस झाला. मध्यवर्ती ग्रंथालयाच्या मागील बाजूला शोषखड्डा आहे. त्यातून पाणी शिरले. भाषाशास्त्र, इतिहासाच्या ग्रंथांचा सुमारे १ लाखापेक्षा अधिकचा अनमोल ठेवा आहे. पुस्तके 'रॅक'मध्येच आहेत. रॅकच्या तळाशी असलेले दोन हजार ग्रंथ भिजले.




बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## ठाकरे मंत्र्यांना देखील चार-चार महिने भेटत नव्हते

### परिवर्तन महाशक्तीच्या मेळाव्यात राजू शेट्टी यांची टीका





**छत्रपती संभाजीनगर :** राज्यामध्ये महाविकास आघाडीचे सरकार असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांना देखील चार-चार महिने भेटत नव्हते तर सर्वसामान्य जनतेचा प्रश्नच येत नाही. अशा शब्दात शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे.

तर दुसरीकडे महायुतीच्या काळात एकमेकांवर कुरघोडी दिसून येत आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात टोळी युद्ध चालू असल्याचे वाटते. अशी टीका राजू शेट्टी यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर मध्ये परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीत सहभागी सर्व पक्ष पदाधिकाऱ्यांचा संयुक्त मेळावा पार पडला, यावेळी ते बोलत होते.

परिवर्तन महाशक्तीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण? असा प्रश्न आता आम्हाला विचारला जात आहे. मात्र हाच प्रश्न महाविकास आघाडीच्या नेत्यांना विचारला असता त्यांनी उत्तर दिले का? किंवा महायुतीतील नेत्यांनी तरी या प्रश्नाचे उत्तर दिले का? असा प्रति प्रश्न राजू शेट्टी यांनी उपस्थित केला. परिवर्तन महाशक्तीमध्ये आम्ही सर्वच शोषित, वंचितांचे प्रश्न मांडणारे सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मांडणारे कार्यकर्ते आहोत. या आघाडीतील सर्वच घटक हे नेते असल्याचे राजू शेट्टी यांनी म्हटले आहे.

परिवर्तन महाशक्ती मध्ये कोणी वंचितांचे प्रश्न मांडणारे आहे तर कोणी दलितांचे प्रश्न मांडणारे आहेत. कोणी महिलांसाठी काम करणारे आहेत तर कोणी युवकांसाठी काम करणारे आहेत. कोणी शेतकऱ्यांसाठी तर कोणी दिव्यांगांसाठी काम करणारे आहेत. या परिवर्तन महाशक्ती मध्ये सर्व समावेशक सामाजिक कार्यकर्त्यांचा देखील समावेश असल्याचा दावा राजू शेट्टी यांनी केला आहे. त्यामुळे मुख्यमंत्रीपदासाठी नाही तर सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी परिवर्तन महाशक्तीची स्थापना करण्यात आली असल्याचे ते म्हणाले.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये कर्णपुरा यात्रेची तयारी




**छत्रपती संभाजीनगर :** कर्णपुरा देवीची यात्रा सुरू होणार आहे. यात्रेला येणाऱ्या भाविकांसाठी प्रत्येक वर्षी १५ फुटांचा रस्ता असयाचा. भाविकांनी दर्शनाला ये-जा करण्यासाठी प्रचंड कसरत करावी लागत होती. त्यामुळे भाविकांसाठी ५० फूटांचा रस्ता मोकळा सोडून रहाट पाळणे, दुकाना उभारा. भाविकांना नाश्त्याची चांगली कॉलिटी देण्याचे सांगा.

पिण्यासाठी पाणी ठेवा. अन्यथा दुकानांसह रहाट पाळण्यांवर कठोर कारवाई केली जाईल, अशा कडक सूचना छावणी परिषदेच्या सीईओ आकांक्षा तिवारी यांनी कंत्राटदार गंगाधर जाधव यांना दिल्या आहेत. सीईओ यांनी गुरूवारी, २६ सप्टेंबर रोजी तब्बल दीड तास यात्रास्थळाची पाहणी केली.

नवरात्रोत्सवाला ३ अॅ◌ाक्टोबर पासून सुरूवात होणार आहे. या निमित्ताने तिथे यात्रा भरते. यासाठी छावणी परिषदेने निविदा प्रक्रिया राबवली होती. हा कंत्राट गंगाधर जाधव यांना ९० लाखांत देण्यात आला आहे. या यात्रेच्या निमित्ताने टीम अॅ◌ाफ असोसिएशन्सने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना पत्र देवून यात्रेचे काय नियोजन आहे, स्वच्छता आणि सुरक्षा कशी असेल हे निदर्शनास आणून दिले होते. या पार्श्वभूमीवर छावणी परिषदेच्या सीईओ आकांक्षा तिवारी यांनी टी अॅ◌ाफ असोसिएशन्स आणि कंत्राटदार यांना बोलावून यात्रास्थळाची पाहणी केली.

यात भाविकांसाठी ५० शौचालय उभारा, ५० फूटांचा रस्ता मोकळा सोडा, रस्त्यावर एन्ट्री एक्झिटचे बांबूनी सर्कल करा. ठिकठिकाणी त्यासाठी रस्ते ठेवा, नाश्त्याची कॉलिटी चांगली ठेवा, करचा तात्काळ उचलला गेला पाहिजे, पाणी शुद्ध ठेवा, ज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे परवाना असेल त्यांनाच नाश्त्याची दुकान लावण्यास जागा द्या, सीसीटीव्ही लावा, लाईट गेल्यास जनरेटरची व्यवस्था करा, अशा विविध सूचना सीईओ आकांक्षा तिवारी यांनी दिल्या. तसेच महिलांच्या सूरक्षेसंदर्भातही पोलिस प्रशासनाची चर्चा करणार आहे, असे तिवारी यांनी सांगितले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: ww.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ सप्टेंबर २०२४

# सुशिक्षित भामटे

- डॉ.बाळासाहेब लिहिणार

दोन भामट्यांची भेट.
एकाचा धंदा लबाडीचा,
एकाचा लूटमारीचा.

दोघेही भ्रष्ट दोघेही दृष्ट.
दोघांचीही भाषा सारखीच.
चरित्र्य आणि च्यारित्र्याशी
दोघांचाही नाही मेळ.
पिठपीछे दोघांनीच केला
एकमेकांचा खेळ.

दोन वेगवेगळ्या मंचावर
एकमेकांची खोलून हाणता.

एका मंचावर आले की,
मात्र गळ्यात गळे घालता.

भाऊ भाऊ आपण
आपणच आहोत शेजारी.
त्याला काय लागते बोंबालयला
सरणावर जाताना आपणच
येऊ कामाला.

तिसरा पाहून गंमत
मनाशीच हसतो.
तुमचा इतिहास
तुम्हीच सांगता
अन् वीट आलेल्या नात्याला
तुम्हीच पुन्हा जोडता.

तिसऱ्याला काय घेणे देणे
एकमेकांचे उनेदूने तुम्हीच
काढता
पण कधी कधी भाड्यानो
तिसऱ्याला का मधी घेता

दळभद्री तुम्ही.
चरीत्र अन् चारित्र्याशी
तुमचा नाही सबंध.
प्रश्न आहे आमचा
चारित्र्यवान माणसांना
तुमच्या मध्ये का गोवता.

वाणी आणि करणित
नाही तुमच्या साम्य.
जगणे आणि वागण्यात
नाही तारतम्य.

वाणी तुमची किळसवाणी
वागणे ही अत्यंत गलिच्छ
गोळा करणे चंदा
हाच तुमचा धंदा.

साक्षर आणि निरक्षरतेची
झाली पाहिजे ओळख.
शिक्षित आणि सुशिक्षितमध्ये
कळला पाहिजे फरक.

इतिहास असो कसाही,
संस्कार असो कसेही,
आता बदल पाहिजे.
सूशिक्षित झालात तुम्ही
आता कळले पाहिजे.
सूशिक्षित झालात तुम्ही
आता कळले पाहिजे.

# चाकूरकरांची तहान भागवणारा बोथी तलाव ओव्हरफ्लो

## चाकूरसह सहा गावांचा पाणीप्रश्न सुटला

**संग्राम वाघमारे**

**चाकूर :** तालुक्यात अनेक भागांत दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे चाकूरकरांची तहान भागवणारा बोथी तलाव ओव्हरफ्लो झाल्याने चाकूरसह अन्य सहा गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे.चाकूर तालुक्यात मागील दोन दिवसांपासून पावसाने चांगलीच हजेरी लावल्यामुळे तालुक्यातील विविध भागांत पाणीच पाणी झाले आहे. त्या पावसाने छोटी छोटी तलाव, नदी दुथडी भरून वाहू लागल्या आहेत. शेतीपूरक पाणी झाल्याने शेतकरी तूर्तास सुखावला आहे. चाकूर तालुक्यात शेळगांव मंडळात ३५ मि. मी. व वडवळ मंडळात ३४ मी मी सर्वाधिक पाऊस झाला आहे. चाकूर मंडळात ११ मि.मी., झरी बु. ३०, नळेगाव ०७, आष्टा ०५ मि.मी.



पाऊस झाल्याने तालुक्यातील जवळपास पाण्याचा प्रश्न सुटला आहे. सोमवार व मंगळवारी झालेल्या जोरदार पावसामुळे नळेगाव, चापोली, वडवळ ना, जानवळ, रोहिणा, झरी या भागात पाणीच पाणी झाले आहे. बोथी तलाव क्षमतेने भरला असून तो ओव्हरफ्लो झाला आहे. बोथी तलावाची १.७१ द.ल.घ.मी एवढी क्षमता असून तो १०० टक्के भरला आहे. या तलावातून चाकूर, हणमंतवाडी, हणमंतवाडी तांडा, तीर्थवाडी, सरणवाडी, बोथी, बोथी तांडा या गावांना पाणीपुरवठा केला जातो. बोथी तलाव तुडुंब भरून वाहू लागल्याने अनेक गावांसाह, शेतकरी, गोरं ढोर आणि जनावरांचा पाण्याचा प्रश्न सुटला आहे.यापूर्वी बोथी तलाव २००४ आणि २०१८ मध्ये ओसंडून वाहिला आहे. वोथी तलावात-सांडोळ, महांडोळ, रोहिणा आणि नागेशवाडी येथून पाण्याचा जास्त विसर्ग होऊन ते बोथी तलावात येऊन साचले जाते. यामुळे बोथी तलावात पाण्याची वाढ होते. तो तलाव तुडुंब भरून वाहू लागल्याने चाकूरसह अन्य सहा गावांचा पाण्याचा मोठा प्रश्न तूर्तास तरी मिटलेला आहे

